B चर्चा करावी

Directorate of H. P. & T.
NAGPUR.
15 MAR 1999

राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत यंत्रमाग सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत

महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- यंत्रमाग १३९८/प्र. क्र. १५८/टेक्स-२
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ फेब्रुवारी, १९९९

वाचा :-
१] राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांचे क्रमांक एनसीडीसी १०-१/७९/टेक्स [एचएलएम], दिनांक १. ११. ९४ चे पत्र
२] शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्र. पीएलएम-१२९४/२२३२/प्र. क्र. ३०७/टेक्स-२, दिनांक १९. १०. ९६
३] शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग क्रमांक पीएलएम-१२९४/२२३७/प्र. क्र. ३०७/टेक्स-२, दिनांक ३. ७. १९९७
४] क्रमांक एनसीडीसी-१०-१/७९-टेक्स [एचएलएम], दिनांक २७. १. ९८ चे पत्र
५] शासन निर्णय क्रमांक सहकार व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक पीएलएम-१२९४/२२३७/प्र. क्र. ३०७/टेक्स-२, दिनांक ५. ३. ९८

प्रस्तावना :-

राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांनी यंत्रमाग धारकाकरीता तयार केलेली योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याचा शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, १९९६ रोजी निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने संदर्भांतर्गत नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय वेळोवेळी निर्गमित केले आहेत. या निर्णयाचे एकत्रिकीकरण करुन एकच शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

या प्रश्नाचा सर्वंकष विचार करुन, शासन याद्वारे यापूर्वी निर्गमित केलेले सर्व शासन आदेशाचे एकत्रिकरण करुन पुढील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे:-

महाराष्ट्रातील यंत्रमाग उद्योगाचा विकास करण्याकरिता राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणी झालेल्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याच्या प्रयोजनार्थ राज्यात

पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येईल :-

| अ. क्र. | कार्य | निगमाकडून राज्य सरकारला कर्ज | राज्य सरकारकडून सहकारी संस्थेला अर्थसहाय्य |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | मार्जिन मनी भागभांडवलासाठी सहाय्य | १०० टक्के कर्ज | ५०% भागभांडवल व ५०% कर्ज |
| २. | माग खरेदी अथवा लूम असलेल्या वर्कशेडचे बांधकाम/आधुनिकीकरण/नुतनीकरण/बांधकाम/गोदाम उघडणे/शोरुम मार्केटिंग कॉम्प्लेक्स सहकारी वस्त्रोद्योग इस्टेट | ९० टक्के कर्ज | ७० टक्के कर्ज<br>२० टक्के भागभांडवल<br>१० टक्के सभासद व. |
| ३. | मागावर येण्याआधीची अथवा नंतरची प्रक्रिया/तयार कपडे/विणाई केंद्र यांची स्थापना | ९० टक्के कर्ज | ५० टक्के कर्ज<br>४० टक्के भागभांडवल<br>१० टक्के सभासद वर्गणी |

२. वरील योजनेखाली अर्थसहाय्य मिळविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था धिनियम, १९६० खाली नोंदीत असलेल्या संस्थांनी परिशिष्ठ "अ" व "ब" मध्ये निर्धारित केलेल्या अटी तसेच, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, महाराष्ट्र शासन आणि संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांजमार्फत वेळोवेळी प्रस्तुत केल्या जाणाऱ्या अटी पूर्ण करणे बंधनकारक असेल.

३. शासन आता असेही निर्देश देत आहे की, या योजनेंतर्गत अर्थसहाय्यासाठीचे प्रस्ताव शासनास सादर करताना पुढील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा :-

या योजनेंतर्गत सहाय्य मिळविण्यासाठी संबंधित सहकारी संस्थांना त्यांचा प्रकल्प अहवाल आवश्यक त्या अटी व शर्ती पूर्ण करुन संबंधित प्रादेशिक उपसंचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांचेकडे थेट सादर करणे आवश्यक आहे. प्रादेशिक उपसंचालक, यांनी सहकारी संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याची छाननी/पडताळणी करुन सदरहू प्रकल्प अहवाल त्यांच्या अभिप्रायांसह संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करावा. प्रादेशिक उपसंचालकाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांनी तपासणी/पडताळणी करुन ते अहवाल त्यांच्या शिफारशीसह शासनास सादर करावेत.

४. ~~या योजनेंतर्गत यंत्रमाग कारखाना उभारण्याकरिता~~ किंवा सहकारी संस्थांना मार्जिन मनीपोटी [परिच्छेद - १ मधील तक्त्यातील अ.क्र. १ व २] देय असलेल्या